सन २०२६-२७ मध्ये राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजना राबविण्यासाठी रुपये ४.०० कोटी इतका निधी वितरीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय, क्र.कृवपदुम-१९०४५/३०/२०२६**-MAG-८A (E-**१६६९७०१**)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय (विस्तार), मुंबई- ४०० ०३२

दिनांक : १९ ऑगस्ट, २०२६

संदर्भ :

१) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.कृयायो-०८१८/प्र.क्र.२३१/१४-अे, दि.१२.०९.२०१८

२) वित्त विभागाचे परिपत्रक, क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६

३) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.-कृवपदुम-१९०४५/२७/२०२६-MAG-८A (१६४९६६९) दि.११.०५.२०२६

४) कृषि संचालक, कृषि अभियांत्रिकी संचालनालय, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र जा.क्र.रा.पु.कृ.यां./गुनि-५/न.क्र.२६६/३४४-र/२०२६-२७, दि.१९.०५.२०२६

५) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.-कृवपदुम-१९०४५/२०/२०२५-MAG-८A (१२३१६९१) दि.०२.०७.२०२६

६) कृषि संचालक, कृषि अभियांत्रिकी संचालनालय, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र जा.क्र.रा.पु.कृ.यां/न.क्र.२६६/५२३-र/२०२६-२७, दि.२४.०७.२०२६

प्रस्तावना :-

राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजना राबविण्यास संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत वैयक्तिक लाभार्थी शेतकऱ्यांना कृषि औजारे/यंत्र खरेदीसाठी अनुदान देणे व कृषि औजारे/यंत्रे बँकांना अनुदान देणे या घटकांची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या कृषि यांत्रिकीकरण उप अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात येते.

२. या योजनेसाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी रु.२०.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत सन २०२६-२७ मध्ये रु.२०.०० कोटीच्या वार्षिक कार्यक्रमास संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयानुसार आतापर्यंत सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता रू.४.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. संदर्भ क्र. ६ येथील पत्रान्वये कृषि संचालक, कृषि अभियांत्रिकी संचालनालय, कृषि आयुक्तालय, पुणे यांनी अर्थसंकल्पित निधीपैकी उर्वरीत निधी उपलब्ध करून देण्याची शासनास विनंती केली आहे. त्यानुषंगाने वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार रु.४.०० कोटी इतका निधी योजनेच्या अंमलबजावणीसाठी आयुक्त (कृषि) यांना वितरीत करण्यास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय** -:

सन २०२६-२७ या वर्षात राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी रू.४.०० कोटी (अक्षरी रुपये चार कोटी फक्त) इतका निधी आयुक्त, कृषि कार्यालयास अर्थसंकल्पिय अंदाज, वाटप व सनियंत्रण प्रणाली (बीम्स) वर वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर निधी सन २०२६-२७ करिता खालील लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पित केलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा.

मागणी क्र.डी-३,
२४०१-पीक संवर्धन,
(११३) कृषि अभियांत्रिकी,
(००) (००) (१८) राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजना (कार्यक्रम)
(२४०१ A९१३),
३३ अर्थसहाय्य.

२. सदर योजनेची अंमलबजावणी करताना केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण उप अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांचे व संदर्भ क्र.१ येथील दि.१२ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयामधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.

३. सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात येत असलेला निधी राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजनेंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांनाच वितरीत करणे बंधनकारक राहील. या योजनेंतर्गत लाभार्थी निवड महाडीबीटी पोर्टलवरुन विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन करण्यात यावी. तसेच, अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांना महाडीबीटी प्रणालीद्वारे आधारसंलग्न बँक खात्यावर सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीव्दारे जमा करावी.

४. या शासन निर्णयाव्दारे वितरीत निधी कोषागारातून आहरित करण्याकरिता पुढील अधिकाऱ्यांना नियंत्रण आणि आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | स्तर | नियंत्रण अधिकारी | आहरण व संतिरण अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | आयुक्तालय स्तर | आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे | सहायक संचालक (लेखा-१), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. |
| २ | जिल्हा स्तर | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील लेखाधिकारी. |

५. सदर निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे/नियम/ परिपत्रक/अधिकारांच्या मर्यादेत/C.V.C. तत्वानुसार/प्रचलित शासन निर्णय/नियम/परिपत्रक/ तरतुदीनुसार बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अंमलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही नियम/अधिकाराचा भंग होणार नाही याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रीय कार्यालयाची राहील. तसेच, सदर निधीचे आहरण

कोषागारातून आवश्यकतेनुसार करण्यात यावे आणि बँक खात्यात अखर्चित निधी शिल्लक राहाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

६. राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजनेची क्षेत्रीय स्तरावर अंमलबजावणी करण्यासाठी कृषि संचालक, कृषि अभियांत्रिकी संचालनालय, कृषि आयुक्तालय, पुणे यांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन, उद्दिष्टनिहाय अंमलबजावणी विषयक सविस्तर सूचना सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना निर्गमित कराव्यात. तसेच, महिला शेतकरी, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती शेतकरी यांच्यासाठी भौतिक/आर्थिक लक्षांक निर्धारीत करण्यात यावेत.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील दि.०९ एप्रिल, २०२६ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन व सदर परिपत्रकातील अटी शर्तीची पूर्तता करुन तसेच, वित्त विभागाच्या अनौसं. ३४६/२०२६/व्यय-१, दि.०४.०८.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१९१३०६१९७८४ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

BHUPESH ARUN KOLI

Digitally signed by BHUPESH ARUN KOLI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=c4831497ab54666fcf0fc384ac56a4a6e7eef3940ffe7ecbeff3b790dc48d7c0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=44C8C2D62EADD87E9FFCCD81C023E722799B7A87A062FC30B0E6A3B49CBA4384, cn=BHUPESH ARUN KOLI
Date: 2026.08.19 13:07:11 +05'30'

**(भुपेश अ.कोळी)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. मा.मंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.राज्यमंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२
३. अ.मु.स. (वित्त), मंत्रालय,मुंबई-३२
४. सचिव (नियोजन), मंत्रालय,मुंबई-३२
५. सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२
६. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. संचालक, कृषि अभियांत्रिकी संचालनालय, कृषि आयुक्तालय,पुणे
८. सर्व संचालक/सह संचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. विभागीय कृषि सह संचालक (सर्व)
१०.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
११.महालेखापाल, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर (लेखा परिक्षा) /(लेखा व अनुज्ञेयता)
१२.माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
१३.नियोजन विभाग (का-१४३१) मंत्रालय, मुंबई-३२.
१४.वित्त विभाग ( व्यय-१ व अर्थसंकल्प-१३ ), मंत्रालय, मुंबई -३२
१५.कक्ष अधिकारी (कार्यासन -२अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१६.निवडनस्ती (कार्यासन -८अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२